13 P12



MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता ™

July To Sept.2021
Issue 39, Vol-10

Date of Publication
01 Sept. 2021

Editor
Dr. Bapu g. Gholap
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली
नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले
वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले

-महात्मा ज्योतीराव फुले

❖ विद्यावार्ता या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायक्षेत्र:बीड

"Printed by: Harshwardhan Publication Pvt.Ltd. Published by Ghodke Archana Rajendra & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor Dr. Gholap Bapu Ganpat.

Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

26) चंद्रपूर जिल्ह्यातील माध्यमिक विद्यालयातील आदिवासी आणि गैरआदिवासी ...
डॉ. एस.एम. सातपुते, चंद्रपूर ||122

27) १९६० नंतरच्या दलित कवितेची वाटचाल
डॉ. संजय शिंदे, राजगुरूनगर ||125

28) 'बीड जिल्ह्यातील मत्स्यव्यवसायाचा विकास'' एक भौगोलिक अभ्यास
डॉ. सोनवणे श्रीराम विक्रमराव, जि.बीड ||129

29) पु. ल. देशपांडे यांचे व्यक्तिचित्र लेखन
उत्तरेश्वर ज्ञानोबा सुरवसे, नागपूर ||132

30) राजर्षी शाहू महाराजांचे जलव्यवस्थापनाचे धोरण
प्रा. डॉ. नितेश प्रेमनाथ सुरवसे, जि. कोल्हापूर ||136

31) ग्रंथालय आणि महाविद्यालयीन प्रगती सहसंबधात्मक आढावा
प्रा. वर्षा अनिलजी तिडके, गडचिरोली ||139

32) राष्ट्रसंत गाडगे बाबा
प्रा.डॉ.भिमराव प्रल्हाद उबाळे, जि.बुलढाणा ||142

33) उदयपुर जिले की भूआकारिकी एवं जलवायविक दशाओं का संक्षिप्त परिचय
श्रीमती वर्षा चुण्डावत & डॉ.हेमेन्द्र सिंह सारंगदेवोत, भीलवाडा (राजस्थान) ||146

34) नई कहानी की विशिष्ठाएँ
देवकुमार दमाई ||152

35) भारतीय संगीत में घराना परम्परा की स्थापना के मुल्य तत्व
डॉ. गुरप्रीत सिंह, चण्डीगढ ||154

36) महिलाओं के विरूद्ध अपराध में महिला पुलिस की भूमिका
डॉ. पुष्पा तिवारी & किरण ठाकुर, रायपुर,, (छ.ग.) ||156

37) 'त्रिलोचन और शिवमंगल सिंह 'सुमन' : एक तुलनात्मक अध्ययन'' (प्रगतिशील ...
डॉ. नेमीचन्द कुमावत, भीलवाड़ा (राजस्थान) ||158

38) उपभोक्ता की समस्याए (Consumers Problems)
श्वेता सिंह, आजमगढ ||165



www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

269

32

# राष्ट्रसंत गाडगे बाबा

**प्रा.डॉ.भिमराव प्रल्हाद उबाळे**
संत भंगवान बाबा कला महाविद्यालय, सिंदखेड राजा, जि.बुलडाणा

************

विदर्भातील अमरावती जिल्ह्यातील, दर्यापुर तालुक्यात शेनगाव येथे वडील झिंगराजी व माता सखुबाई यांच्या पोटी राष्ट्रसंत गाडगे बाबांचा जन्म २३ फेब्रुवारी १८७३ ला महाशिवरात्रीच्या दिवशी झाला. गाडगेबाबाचे पुर्ण नाव डेबुजी झिंगराजी जाणोरकर असे होते.

झिंगराजीकडे ६ एकर ३३ गुंठे जमीन होती. परंतू झिंगराजी ला दारुचे व्यसन जडले. त्या व्यसनापायी घरची परिस्थिती खालावत गेली. थोड्याच दिवसात संसाराची धुळधाण झाली. घरातील लोकांची उपासमार होवु लागली. यातच झिंगराजी आई झिपराबाई यांचे निधन झाले. झिंगराजीला आता कुणाचाच धाक नव्हता. सर्व रान मोकळे झाले होते. झिंगराजी व्यसनापायी कर्जबाजारी झाला. त्यानं हरलालजी लढ्ढा नावाच्या सावकाराकडे जमिन गहाण ठेवली. कागदावर अंगठा देवून निरक्षर झिंगराजी पैसे घेवून मोकळा झाला. रोजच्या रोज दारु आणि बकऱ्याच मटन यांच्यावर ताव मारायला सुरूवात केली. पुन्हा हालाखीचे दिवस आले. सखुबाई दिवसभर कष्ट करुन संसाराला हातभार लावीत होती.

दारुच खुपच व्यवसन जडल्यामुळे झिंगराजीची तब्बेत खंगत गेली. त्याने आता अंथरुन धरले होते. आपण आता जास्त दिवस जगणार नाही असे त्याला वाटू लागले. तेव्हा त्याने आपल्या पत्नीला जवळ बोलावून घेतले आणि कळवळून बोलु लागला, तुला अन डेबूला म्या दुःखात लोटलं. आता एक गोष्ट ध्यानात ठेव. डेबु मोठा होईल, तो कोठे राहील, काय करेल मला मालुम नाही ! मात्र एक कर त्याला देव देवतांच्या नांदी लागु देवू नको. अन दारुकड वळु देवु नको.

ऐवढे बोलून झिंगराजीची प्राणज्योत विझली. सखुबाई आणि डेबू पोरके झाले.

**बालपण :**

झिंगराजीच्या मृत्युची बातमी डेबुजीचे मामा, सखुबाईचे बंधु चंद्रभानला दापुरे गावी कळली. बहीणीच्या दुःखाने चंद्रभान कासावीस झाला. दुःखात सापडलेली बहीन आणि भाच्या घेवून तो दापुऱ्याला आला. शेनगावातील सखुबाईच घ काही सावकाराने काबीज केले होते. सखुबाईवर पती गेल्य कोसळल होत. म्हणून माय लेकरांनी दापुऱ्याचा आश्रय दापुऱ्यास सखुबाईचे वडील हंबीररावच कोळसकर व कोळसकर यांच्याकडे ६० एकर जमिन होती. तिही सुपी धनधान्याची विपुलता होती. गायी गुरांनी वाडा भरलेला

लहानग्या डेबुजीचे बालपण दापुरे या गावी गे घरी डेबुजीला अनेक कामे करावी लागत. दिवसभर गायी चारावयास नेणे, गोठ्यातील गुरांचे शेणमुत काढणे. हा कामे डेबुजी मन लावून करायचा. स्वभावाने तो धिट अ होता. या सर्व कामामुळे त्याचे शिक्षण होवू शकले नाही. दळतांना ओव्या म्हणायची. त्या तो लक्षपुर्वक एकायचा व पा डेबुजीचा आवाज फार गोड होता. त्यामुळे भजनी मंड भजनी मंडळात सामिल करुन घेतले होते. डेबुजी भ गावोगावी फिरत होता. निरनिराळे अभंग गोड गळ्याने त्यातील शब्दाचा अर्थ समजावून घेवून ओव्यांचा अर्थ ल

**लग्न :**

डेबुजीच वय दिवसेंदिवस वाढत होत. रिवाजानुसार, त्या काळच्या चालीनुसार डेबुजीचा विवाह १८८२ मध्ये झाला. विवाहाच्या वेळी डेबुजी १४ वर्षाचा ह कुंताबाईच वय ८ वर्षाच होत. कुंताबाई कमालपुरच्य खल्लारकरांच्या कन्या होती. डेबुजी गरीब असला तरी तो आहे. इमानदार आहे, कष्टाळु आहे. अशी माणसं त्याका ठेवली जात. डेबुजीमध्ये कमीत कमी सालानं ठेवण्यापुर होते. त्याच्या होणाऱ्या सासऱ्याने विचार केला होता. पोराजवळ जमीन नाही. मामाच घर उद्या सुटलं तरी सालदार बन गावाजवळ त्याची इज्जत आहे. विवाहानंतर डेबुजी मामा राहत होता. रात्री भजनासाठी गावोगावी फिरणं, दिवसभर शे करनं, असा डेबुजीचा नित्यक्रम ठरलेला असे. वयात अ डेबुजी व कुंताबाईला मुलगी झाली. सखुबाई, मुलगा, स नातीमध्ये खुश होत्या. डेबुजीचं मनही संसारात रमल होतं.

या सुखी संसारावर पुन्हा दुःखाचा डोंगर कोसळल मामावर काळान झडप घातली. मामानं समाधानानं मृत्यु केल होतं. त्यांचा मुलगा अणि पत्नी सांभाळण्यासाठी भा समर्थ होता. ऐवढा विश्वास डेबुजीनं मामाच्या मनात निम होता. चंद्रभानवर मरतांना सावकाराचं कर्ज होतं. मरतांन आशा होती की डेबुजी आपल कर्ज निवारील.

**व्यवहारी डेबुजीचा सावकाराला धक्का :**

मामावर सावकाराचं कर्ज आहे हे डेबुजीला माहीत होत. कर्ज फेडण्यासाठी डेबुजीन कंबर बांधली. कष्ट करणे वाढविले. सण, समारंभ, बारसं, धार्मिक विधी करण बंद केले. शेतातील सारं पिक सावकाराला दिल. तरीही सावकार शांत होत नव्हता कर्ज कमी न होता वाढतच होत. डेबुजीला लिहीता वाचता येत नव्हतं. पण व्यवहार कळत होता. शेतातील सर्व माल दिला म्हणजे कर्ज काही ना काही कमी होत, एवढ तरी त्याला ज्ञान होत. त्यान सावकाराला हिशोब विचारला. हिशोबाची पावती मागीतली. पावती मागण्याचा सावकाराला आश्चर्य वाटल व रागही आला.

सावकाराने हिशोब न देताच चंद्रभानजीचा शेत ताब्यात घेण्याच ठरवल. डेबुजीन नांगरून टाकलेल ते शेत काळजाच्या तुकड्याप्रमाणे काळभोर दिसत होतं. सावकार ते शेत ताब्यात घेणार, याची चाहुल डेबुजीला लागली होती. डेबुजी अगदी सकाळीच औत घेवुन शेतात गेला. डेबुजीच औत सुरू असतांनाच सावकार जमिनीवर ताबा करण्यासाठी चार पहिलवान व एक महार घेवून शेतात पोहचला. महार त्याच्या जवळ गेला दोघांमध्ये शाब्दीक चकमक सुरू झाली. डेबुजी त्याला म्हणाले, म्या येतांन बायकोच कुंकु पुसून आलो, तुही कुंकु पुसून आलास का ? डेबुजी मारायला आणि मरायला तयार आहे. हे महारानं ओळखल, तो बाजुला झाला. तेव्हा सावकारान पैलवानांना इशारा केला. त्यांनी दोहोबाजूनी डेबुजीला धरलं. झटापट सुरू झाली. डेबुजीन झटका देवून दोन्ही पहीलवानांकडुन आपली सुटका करुन घेतली. एका पहीलवानाच्या पोटात लाथेचा जोरदार दणका दिला. विजेच्या चपळाईन बाजुला पडलेली औतासोबतीची कानाएवडी काठी हातात घेतली. अन बेफाम वादळा सारखा सावकाराकडे धावला. डेबुजीच्या या आक्रमक रुपानं सावकार घाबरला होता. तो चाणाक्ष होता. शेतापेक्षा त्याला त्याचा जिव भारी होता. घोड्याचा लगाम खेचुन घोडा गावाकडे पळवित असतांनाच डेबुजीची काठी सावकाराला न लागता तिचा रट्टा बसला तो सावकाराच्या घेड्याच्या पाठीवर. या जोरदार रट्यामुळे घोडा खिंकाळत उधळला. तो गावाशिवाय थांबलाच नाही. सावकार ही मनातून पुरता घाबरला होता. डेबुजीच्या तावडीतून सुटका झाली म्हणून मनोमन देवाचे आभार ही मानीत होता. सावकाराशी दोन हात केल्यामुळे डेबुजीचा दरारा व लौकीक गावामध्ये वाढला होता. लोकांनाही सावकाराला जाब विचारणारा, त्याच्या तावडीतून सामान्य लोकांना मुक्त करणारा कुणी तरी हवा होता. त्यामुळे डेबुजी विषयी लोकांच्या मनात आदराचे स्थान निर्माण झाले होते.

**डेबुजींचा गृहत्याग :**

डेबुजीन सावकाराच्या तावडीतून चंद्रभान मामाची जमिन सोडविली होती. त्याचा आपल्या शक्तीवरचा विश्वास त्या दिवसापासून वाढला होता. दिवस रात्र शेतात राबत होता. संसाराचा गाडा ओढीत होता. पण मनात सारखी बेचैनी वाढत होती. डेबजीच मन संसारात रमत नव्हत. मनात वैराग्याचे विचार येत होते. त्याला सावकाराशी पुन्हा शत्रुत्व नको होते. भांडण नको होती. सावकारी पाशामुळे लोकांचे होणारे शोषण त्याला अस्वस्थ करीत होते. आपले वडील झिंगराजी प्रमाणे लाखो-हजारो झिंगराजी दारुच्या व्यसनाने, देवधर्माच्या अनिष्ट रुढीने बरबाद होतांना तो बघत होता. समाजातील दारिद्रय, अज्ञान, देव-धर्म, कर्मठ रुढी यामुळे डेबुजीच मन पिळल्या जात होत. सामान्य माणसात या विषयी जागृती होण आवश्यक वाटत होत. मनात सारखी बेचैनी वाढत होती. विचाराच्या तंद्रीतच डेबुजी एका रात्री शांतपणे उठले. आपल्या जवळ जे काही चांगल होत. ते बाजुला ठेवल. चांगल काही नव्हतच. नेसण्याच चांगल असलेलं धोतर सोडल, जुन धोतर नेसल. दिव्याच्या मिनमिनत्या प्रकाशात सर्व घर न्याहाळलं, त्या घराला नमस्कार केला. जगाच्या संसार सुधारण्यासाठी डेबुजी बाहेर पडले ते पुन्हा न परतण्यासाठीच.

**बाबांची भटकंती :**

संसारात आलेल्या अनेक अनुभवातून डेबुजी गुरू करण्या नाकारलं. खर तत्वज्ञान दुस-या कोणाकडून मिळणारच नाही. ते आप आपणच शोधल पाहिजे. त्यामुळे ते नेहमी सांगत माझा गुरू को नाही.

हा भटकंतीचा काळ त्यांचा तपस्सेचा काळ होता. साधने काळ होता. हि तपश्चर्या त्यांना जनमाणसात राहून करायची हो घर सोडतांना माणुसकीची, खडतर कष्ट करण्याची, कमीतकमी गरज भक्कम अशी गाठोडी डेबुजीनं सोबत घेतली होती.

वाट दिसेल तिकडे डेबुजी फिरत होते. समाजाचं द दारिद्रय, अज्ञान, दैववाद, जातीयता जवळून बघत होते. अनुभव होते. या भटकंतीत ते आपली परिट हि जात कोणास सांगत न कोणी विचारल्यास महार, मांग, चांभार अशी कोणतीही एक ज सांगत.

या भटकंतीत बाबांनी आपला वेश पुर्णपणे बदलला. ठिगळं लावलेली रंगीबेरंगी कपडे वापरण्यास सुरूवात केली. डोक जेवणासाठी गाडगे, हातात काठी व खराटा एका कानात फुटकी क डोक्यावरचे केस पुर्ण काढलेले. तर दाडी वाढलेली लोक त्यांच वेशामुळे सुरूवातीला त्यांना चिंध्याबाबा, गोधडेबुवा म्हणत. बाबांचा जणमानसांवर प्रभाव वाढत गेला. लोक त्यांना आ गाडगेबाबा म्हणू लागले.

**कष्टाची भाकरी :**

या भटकंतीच्या अवस्थेत बाबांनी कधीही हरामाची भाकरी खाल्ली नाही. बाबा ज्या गावात जात. ते गाव झाडून स्वच्छ करीत. कुणी खाण्यासाठी काही दिले तर ते घेत नसत. भुक लागली म्हणजे ते जंगलात जात. काड्याची (सरपण) मोठी मोळी बांधून आणित. ती एखाद्या घरी टाकून नंतर ते भाकरी मागत.

त्यांच जेवनही साध असे. वरणाच पाणी आणि ज्वारीची भाकरी. बाबा कुणाच्या घरी काड्या आणून देत. तर कुणाच्या शेतात काम करीत. कुणा साहेबाच्या बंगल्यासमोरचं गवत काढून देत. कुणी पैसा देवु केला तर तो त्यांनी कधीही स्विकारला नाही. बाबांनी कधीही फुकटचे अन्न खाल्ले नाही.

**मुक्या प्राण्यावरील प्रेम :**

बाबांनी अनेक गावे, तिर्थक्षेत्रे झाडून स्वच्छ केली. लोकांच्या मनातील, डोक्यातील अंधश्रध्देची घाण ही किर्तनातून स्वच्छ केली. पण बाबा कधीही कोणत्याही मंदिरात गेले नाहीत. देवाच दर्शन तर कधीच घेतले नाही. माझ्या पोरीच्या जन्माच्या आनंदात मी मुक्या प्राण्यांचा जीव घेणार नाही. असे त्यांनी आपल्या जातभाईंना स्पष्टपणे बजावले होते.

बाबा एकदा दर्यापुरला गेले. दसऱ्याचा दिवस होता. तिथला एक तालेवार मानकरी आपल्या घराण्याची परंपरा जपण्यासाठी हेल्याचा बळी देणार होता. बाबा बळी देण्याच्या ठिकाणी गेले. क्रुर वैभवाचा थाट तेथे होता. बारा हेल्यांचा बळी तिथे दिला जाणार होता. रेशमी सोवळ्यात बारा ब्राम्हण मंत्र म्हणत होते. तालेवार महाशय जमलेल्या गर्दीसमोर आपल्या पराक्रमाचे प्रदर्शन करायला तलवार उपसून उभे होते. बाबांनी कळवळून सर्वांना समजावलं पण काही उपयोग झाला नाही. रेड्यासमोर उभे राहून त्यांनी तलवारी समोर स्वतःची मान झुकविली.

मुक्या रेड्यांना मारुन तुमचा पराक्रम व पुजाऱ्याचा धर्म वाढणार असेल तर रेड्यापेक्षा माणसांचाच वध करा. त्यासाठी सुरवातच माझी मान कापण्यापासून करा. रेड्यासाठी बाबा आपला जीव देण्यास तयार झाले होते. तेव्हापासून ती रेडे कापण्याची प्रथा बंद झाली.

बाबांच्या बालपणाची एक घटना सांगितली जाते. शेतात काम करणाऱ्या बैलापैकी एक बैल म्हातारा झाला होता. शेतीच्या कामासाठी तो फारसा उपयोगी नव्हता. त्याच्या तरुणपणी शेतात भरपुर काम करुन त्यांन शेतीतून सोन पिकविल होत. हे डेबुजीच्या चांगल लक्षात होत. बैल म्हातारा झाला म्हणून घरच्यांनी विक्रीस काढला. त्यावर डेबुजी बोलले, घरातील माणसं म्हतारी झाली आता त्यांचा काय उपयोग अस म्हणून विकायची की काय ? ज्याला पोटच्या मुला समान जपलं त्याला कसायाला विकायचे की काय ?

अनेक भाकड म्हाताऱ्या झालेल्या गायी शेतकरी कसा विकत. बाबा त्याला विरोध करीत. गाईच्या संवर्धनासाठी त्यांनी ठ गोरक्षण संस्था लोकसहभागातून उभ्या केल्या. हजारो गाईची कसा तावडीतून सुटका केली.

समाजाची काळजी वाहणाऱ्या बाबांनी माणसाबरोबरच प्राण्याचीही काळजी घेतली. मुक्या प्राण्यांना जीव लावला. पशु बाबा कडाडून विरोध करीत.

**बाबांचे किर्तन :**

बाबा कोणत्याही गावी गेले की संपूर्ण गाव झाडून स करीत. गावातील चावडीही झाडून स्वच्छ करीत. कुणी स्वच्छते वि विचारल तर सांगत. आज कुण्यातरी महाराजांच किर्तन आहे. बा किर्तनाला कोणतेही साहित्य लागत नसे. दोन्ही हातात दोन घेवुन बाबा त्यांचा टाळा सारखा उपयोग करीत. गापाला गोपाला दे नंदन गोपाला हे त्यांच्या आवडीच भजन.

संध्याकाळी देवळाच्या पटांगणात, कधी चावडी सम स्वतःच किर्तन करीत. किर्तन म्हणजे परमेश्वराच नामस्मरण उ ईश्वराचा महिमा लाकांना सांगणे. पण बाबांचे किर्तन अशा प्र नसे. ते लोकप्रबोधनाचे किर्तन करीत. परमेश्वराचा महिमा, र न्याय, त्याचे सर्वव्यापकत्व सांगतांना ते सामाजिक व्यंगावर बोट लोकांशी संवाद साधत-साधत त्यांचे किर्तन चाले.

अंधश्रध्दा, प्राणी हिंसा, अस्वच्छता, रुढीप्राम कर्जबाजारीपणा, नशापाण, अस्पृश्यता, अडाणीपणा, शिक्षणाचे यावर श्रोत्यांशी संवाद साधत ते आपला किर्तनाचा विषय मां लोकभाषेत, लोकांना समजेल असे उदाहरणे देऊन बाबांचे कि चाले. सामान्य माणसाला आडाणी माणसाला विचार प्रवृत्त करा सामर्थ्य बाबांच्या किर्तनात असे. समाजावर, समुहमनावर सं घडविण्याची त्याची जगावेगळी शैली होती. धर्मकिर्तनाचा उ समाजमन घडविण्यासाठी कसा करता येतो याची त्यांनी जगावे प्रयोगशाळाच उघडली होती.

किर्तनामध्ये बाबा लोकांना सांगत, देवाला नवस करु नवसामध्ये कोंबडी, बकरा यांचा बळी देवू नका. कर्ज काढून यात्रेला जावू नका. एक वेळ उपवासी रहा, पण मुलांना शिक्षण जातीयता पाळू नका. हे ते उदाहरणे पटवून देत. आई-वडीलांची करा. अशा अनेक विषयावर श्रोत्यांशी संवाद साधून बाबा स जागृती करत. बाबांचे किर्तन म्हणजे बाबाचे प्रश्न आणि लो उत्तरे असत.

**बाबांचे सामाजिक कार्य :**

[illegible]